# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

**ग्राहक तक्रार क्र. ७५/२०११** **दि.०४.०३.२०११**

| | |
|---|---|
| **सहस्त्र केमिकल्स प्रा.लि.<br>प्लॉट नं.बी - १४<br>लोटे परशुराम एम.आय.डी.सी,<br>ता.खेड, जि.रत्नागिरी.** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता 'महावितरण'<br>स व सु विभाग खेड .** | **विरुध्द पक्षकार** |

| | |
|---|---|
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२) श्री. व्ही.बी.जगताप , कार्यकारी अभियंता<br>३) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१. श्री.डी.अे.जाधव.<br>२. श्री.सुरज चं.कोळी.** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१. श्री.निलेश ए.रौंदळे, सहाय्यक अभियंता उपविभाग लोटे<br>२. श्री.सुहास द.भुस्कुटे, सहाय्यक लेखापाल उपविभाग लोटे.** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

तक्रारदार औद्योगिक ग्राहक सहस्त्र केमिकल्स प्रा.लि., प्लॉट न. बी -१४, लोटे परशुराम एम.आय.डी.सी., खेड यांनी नवीन वीज जोडणी प्रलंबित राहील्याने तक्रार दाखल केली असून सोबत आवश्यक तो तपशिल जोडण्यात आलेला आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्र.८६०, दि. ०५.०३.२०११ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता, खेड विभागीय कार्यालय यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले असता, विहीत कालावधीत ते दाखल झाले नाही म्हणून दि. २९.०३.२०११ ला पुन्हा स्मरणपत्र पाठवण्यात येवूनही स्पष्टीकरण प्राप्त न झाल्याने आयोगाच्या नियमावलीनुसार नोटीस काढण्यात येवून दि.१८.०४.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीत ग्राहकाच्या वतीने सबंधीत युनिटचे संचालक श्री.जाधव व त्यांचे सहाय्यक श्री.कोळी उपस्थित राहून आपला युक्तीवाद केला आणि महावितरणच्या वतीने श्री.रोंदळे, सहाय्यक अभियंता, लोटे उपविभाग व श्री.भुस्कुटे, सहाय्यक लेखापाल, लोटे उपविभाग उपस्थित राहीले पण कोणतेही लेखी स्पष्टीकरण देण्यात आले नाही. तक्रारीच्या अनुषंगाने सबंधित ग्राहकाला पाठवण्यात आलेल्या पत्राची प्रत तसेच लोटे कार्यालयातून दि.२१.०९.२०११ रोजी विभागीय कार्यालय, खेड यांना पाठवण्यात आलेल्या पत्राची प्रत दाखल करण्यात आली.

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असे की, ग्राहकाने प्लॉट नं बी - १४, लोटे परशुराम एम.आय.डी.सी., येथील प्लॉट Mumbai Debts Recover Tribunal No.३ यांनी दिलेल्या आदेशानुसार विकत घेतला असून कोर्टाच्या विक्री सर्टीफिकेट्सची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. सदरहु प्लॉटवर तात्पुरत्या स्वरुपाची ५ एच.पी. वीजजोडणी करुन मिळावी म्हणून अर्ज दाखल करण्यात आला असून आवश्यकतो पाठपुरावाही करण्यात आलेला आहे. तथापी या अर्जाला महावितरणने दि.२८.०२.२०११ च्या पत्रानुसार खुलासा केला असून ग्राहकालाच P.D.Arrears Certificate हे M/s Avi Photochem Ltd. बाबत मागण्यात आले असून हे सर्टीफिकेट रत्नागिरी मंडळ कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्याबाबत याच पत्रानुसार सुचना देण्यात आलेली आहे. मंडळ कार्यालयाने सुचवल्यानुसार आणि दि.२९.१२.२०१० च्या पत्रानुसार सबंधित ग्राहकाने रु.६६०५/- ( रु.सहा हजार सहाशे पाच मात्र ) चा भरणा पावती क्र.५८७७५९७, दि.०३.०१.२०११ नुसार करण्यात आलेला आहे, तथापी ग्राहकाने OTS Scheme Sales Certificate इ.दाखल करुनही वीज जोडणीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. लोटे परशुराम उपविभागाकडून कार्यकारी अभियंत्याना केवळ पत्र पाठवण्यात आले असून वीज जोडणीबाबत कोणतीही कार्यवाही किंवा अन्य संपर्क करण्यात अलेला नाही. ग्राहकाची तातडीची गरज असल्याने मंचाकडे प्रकरण दाखल झालेले आहे. ग्राहकाने आपल्या तक्रारीत सदरहु वीजजोडणी तातडीने मिळावी असाच आग्रह केलेला आहे.

सुनावणी कालावधीत ग्राहकाने वीज जोडणीबाबतची वस्तुस्थिती सांगून आवश्यक ती कागदपत्रे दाखल केली. यामंध्ये प्रामुख्याने Mumbai Debts Recover Tribunal ३ यांच्याकडून आलेला आदेश तसेच The Free Press Journal, Mumbai या दैनिकात देण्यात आलेली जाहीर नोटीस (दि.१०.०७.२०१०) याची प्रत देण्यात आली. ग्राहकाने आपल्या युक्तीवादात स्पष्ट केले की, सबंधित थकबाकी युनिटबाबत बँक ऑफ बडोदाने दाखल केलेल्या दाव्यानुसार सबंधित मालमत्तेचा जो लिलाव करण्यात आला त्या लिलावातील अटी आणि शर्तीनुसार प्रॉपर्टी विकल्याबाबत दिलेल्या सर्टीफिकेट नुसार सदरहु जागेचा ताबा देण्यात

आला असून खरेदीचे सर्व सोपस्कार पुर्ण झाले असल्याने दि.१३.०९.२०१० पासून सबंधित कंपनी घेण्यात आलेल्या प्रॉपर्टीची मालक झालेली आहे. लिलावातील अटींची पुर्तता केली असल्याने तसेच सर्व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण झाल्या असल्याने अन्य कुणाचा बोजा किंवा थकबाकी असल्यास ती क्लेम न झाल्याने कोणतेही Arrears भरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वर्तमान पत्रात देण्यात आलेल्या जाहीर नोटीसीनुसार तसेच बँक ऑफ बडोदाने दाखल केलेल्या दाव्यानुसार महावितरणची थकबाकी कोठेही समाविष्ठ झालेली नव्हती आणि त्यामुळेच मालकी हक्काचे सर्व सोपस्कार पुर्ण करण्यात आलेला आहे. ऑर्डर व अन्य पुर्तता दि.०९ जुलै २०१० रोजी करण्यात आलेली असून या अनुषंगाने दि.१३.०९.२०१० रोजीच जागेची मालकी निर्वेध प्राप्त झालेली आहे. सदरहु वीज जोडणी आमच्या मागणीनुसार नवीन असल्याने सद्या तात्पुरत्या ५ एच.पी. जोडणी करिता अर्ज दाखल झाला असल्याने वीज जोडणी विनाविलंब देण्यात यावी.

महावितरणच्यावतीने वरिष्ठ स्तरावरील कोणीही अधिकारी उपस्थित नव्हते आणि सहाय्यक अभियंता, लोटे परशुराम यांनी उपलंब्ध कागदपत्रांच्या आधारे फक्त माहीती पुरवली. तथापी अन्य कोणतेही स्पष्टीकरण दाखल करण्यात आले नाही. अधिक चौकशी केली असता सहाय्यक अभियंत्यानी सबंधित थकबाकीच्या वसुलीकरिता दावा दाखल झाला असून त्याचा नबंर स्पेशल दिवाणी मुकादमा नं.४९/२००१ असल्याचे नमुद करुन एकूण थकबाकी करिता झालेल्या दाव्याचा निकाल रत्नागिरी येथील दिवाणी न्यायालयाने दिला असून त्याची प्रत मंचाकडे दाखल करण्यात आली. महावितरणच्या म्हणण्यानुसार सदरहु वसुलीचा दावा खर्चासह मंजुर करण्यात आला असल्याने हुकुमनाम्याची कार्यवाही अद्याप केली नसल्याचे नमुद केले. हुकुमनामा प्राप्त तारीख दि.१९.०१.२००९ ची असून अद्याप वसुली केली नसल्याचे ही स्पष्ट केले. अन्य कोणताही तपशिल अथवा युक्तीवाद महावितरणकडून दाखल करण्यात आला नाही.

तक्रार प्रकरणातील एकूण वस्तुस्थिती, उभय बाजुनी दाखल करण्यात आलेला तपशिल आणि अनुषंगिक कागदपत्रे विचारात घेता वीजजोडणी तात्काळ देण्याची ग्राहकाची मागणी रास्त असुन महावितरणने वीज विधेयक २००३ आणि आयोगाच्या नियमावलीचा स्पष्टपणे भंग केला असून विहीत कालावधीत कार्यवाही करण्याचे बंधनकारक असूनही महावितरणकडून वीजजोडणी बाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे उघड झाले आहे. वीजजोडणी देण्याबाबतच्या दिरंगाईला कोणतेही संयुक्तीक कारण स्पष्ट होत नसून ग्राहकालाच P.D.Arrears Certificate आणण्याची सुचना दिलेली दिसते. विधेयकातील कलम ४३ नुसार अर्ज केल्यानंतर तात्पुरत्या किंवा कायम स्वरुपी वीजजोडणी करिता जी कार्यपध्दती ठरवून देण्यात आलेली आहे, ती पाळण्यात आलेली नाही. कलम ४५ आणि कलम ४६ जोडणी बाबत, तसेच अन्य खर्चाबाबत स्पष्टपणे नमुद केले असतानाही जोडणीबाबत कोटेशन देण्यात आलेले नाही. आयोगाच्या स्टॅण्डर्ड ऑफ परफॉरमन्स मधील नियमावली ४ आणि सप्लाय कोडमधील नियमावली २ आणि ३ नुसार स्पष्ट तरतुदी असतानाही त्याचे पालन न करता मुळ ग्राहकाच्या थकबाकी बाबत केलेली मागणी पुर्णपणे चुकीची आणि तरतुदींचा भंग करणारी आहे. तक्रारदार ग्राहकाने बँकेने केलेल्या अर्जानुसार आणि डी.आर.टी.३ मुबंई ने काढलेल्या आदेशानुसार वसुली प्रक्रियेत भाग घेवून सबंधित M/s Avi Photochem Ltd. ची स्थावर आणि जंगम मालमत्ता खरेदी केलेली आहे. खरेदीचा संपुर्ण तपशिल उपलब्ध असून डी.आर.टी कडून Certification of Sale of Immovable Property ग्राहकाला देण्यात आल्याने मालकी हक्क प्राप्त झाल्यानंतरच ग्राहकाने तात्पुरत्या आणि कायमस्वरुपी वीजजोडणी करिता दि.१८.०२.२०११ आणि २४.०२.२०११ नुसार आपली मागणी नोंदविलेली आहे. महावितरणच्या थकबाकी बाबत

वस्तुस्थिती माहीत असतानाही ग्राहकाला केवळ वीजजोडणीचा विलंब व्हावा याच उद्देशाने दि.२८.०२.२०११ रोजी पत्र दिलेले दिसते. वास्तविक पाहता औद्योगिक ग्राहाकाच्या अश्या मागणीला विभागीय कार्यालयाकडून विहीत कालावधीत कार्यपध्दती नुसार सबंधित अर्जाची दखल घेणे गरजेचे होते पण ती बाब करण्यात आलेली नाही कि ज्यामुळे महावितरणच्या महसुलाचे लाखो रुपयाचे नुकसान झाल्याचे स्पष्ट दिसून येते.

महावितरणनेच दाखल केलेल्या कागदपत्रावरुन पुर्वाश्रमीचे ग्राहक म्हणजे M/s Avi Photochem Ltd. यांच्या थकबाकी वसुलीचा दावा दाखल करण्यात आला होता, सदर दाव्याचा क्र.स्पेमु.नं.४९/२००१ असा होता, या दाव्याचा निकाल लागलेला आहे. तथापी स्पेमु.नं.४९/२००१ या दाव्याचा मे.कोर्टाने निकाल दिल्यानंतर थकबाकीच्या रकमेचे रुपांतर ता.१९.०१.२००९ नंतर Decreetal Amount ( हुकुमनाम्याची रक्कम) मधे झालेले आहे व ती रक्कम या तक्रारदाराकडून थकबाकी म्हणून वसुल करणे कायदेशीर होणार नाही. महावितरणने सदरहू Decreetal Amount सिव्हील प्रोसिजर कोडच्या ऑर्डर २१ प्रमाणे M/s Avi Photochem Ltd. यांचेकडून वसुल करणे कायद्यास अपेक्षित आहे व तसे त्यांनी करावे असे मंचास वाटते.

या दाव्याच्या हुकुमनाम्यानुसार महावितरणकडून आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. हुकुमनाम्यानुसार अजुनही महावितरणला वसुली करता येणे शक्य आहे कि ज्याचा पाठपुरावा तातडीने झाला पाहीजे. तक्रारदार ग्राहकाच्या वीजजोडणी अर्जाशी या थकबाकीचा कोणताही सबंध नाही. महावितरणच्या सबंधित विभागाने ही तक्रार मुळातच गांभीर्याने घेतलेली नाही आणि त्यामुळेच वरिष्ठ स्तरावर अधिकारी हजर न राहणे, स्पष्टीकरण दाखल न करणे अश्या घटना घडलेल्या आहेत की ज्यास केवळ महावितरणची सध्याची कार्यपध्दती कारणीभूत आहे. ग्राहक या बाबीकरीता जबाबदार असूच शकत नाही. तीन महीन्याचा कालावधी होवूनही आलेल्या अर्जाची कोणतीही प्रक्रिया पुर्ण न करणे, थकबाकी वसुल न करणे, यासारखी कायद्याची पायमल्ली अन्य कोणती असूच शकत नाही. कायद्यातील तरतुदी आणि आयोगाच्या नियमावलीनुसार तात्पुरत्या आणि कायम स्वरुपी वीजजोडणीच्या अर्जावर तातडीने कार्यवाही करुन तसेच आवश्यक ते सोपस्कार पुर्ण करुन ग्राहकाला विनाविलंब जोडणी मिळणे हे कायद्याला अपेक्षित असून महावितरणवर बंधनकारक ही आहे. तक्रार प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता महावितरणकडून कोणतीच कारणमीमांसा किंवा नेमकी दिरंगाई याचे स्पष्टीकरण न आल्याने उपलब्ध तपशिलानुसार ग्राहक तातडीने वीजजोडणी मिळण्यास पात्र आहे.

मंचाच्या या उपरोक्त निष्कर्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत असून त्याची कार्यवाही महावितरणवर बंधनकारक राहील.

# आदेश

**१. ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात आली असून ग्राहकाने केलेल्या मागणीनुसार त्यास तात्पुरते आणि कायम स्वरुपी औद्योगिक वीजजोडणी सर्व तांत्रिक बाबीची पुर्तता करुन हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसात देण्यात येवून वीज पुरवठा सुरु करण्यात यावा. सदरहु वीज जोडणी देण्यास महावितरणकडून विलंब झाल्यास, विलंबाच्या प्रत्येक दिवसाला रु.१००/- ( रु.शंभर मात्र) भरपाई ग्राहकाला देण्याचे महावितरणवर बधंनकारक राहील.**

२. तक्रार प्रकरणातील विलंब, प्रशासनातील हलगर्जीपणा आणि नियमावलीचा भंग इ. करिता महावितरण जबाबदार असून ग्राहकाला भरपाई आणि अनुषंगिक बाबीकरता रु.२०००/- (रु.दोन हजार मात्र) हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसात देण्यात यावेत.

३. खर्च किंवा अन्य बाबीबद्दल कोणताही आदेश नाही.

४. वरील आदेशाची विहीत कालावधीत कार्यवाही करुन पुर्तता अहवाल खेड विभागीय कार्यालयाने मंचाकडे ३० दिवसात दाखल करावा अन्यथा दंडात्मक कारवाईस खेड विभागीय कार्यालय पात्र राहील.

५. या आदेशाविरुध्द ग्राहकांस अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

पत्ता :-

सचिव,
लोकपाल महाराष्ट्र राज्य विदयुत नियामक आयोग
६०६/६०८, केशवा बिल्डींग,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.
फोन नं. ०२२ / २६५९२९६५

| डी. एस्. जामखेडकर | व्हि.बी.जगताप | एन्.ए.कुलकर्णी |
| --- | --- | --- |
| अध्यक्ष | कार्यकारी अभियंता व सचिव | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- ०३.०५.२०११
ठिकाण :- रत्नागिरी.